# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- १०४-२३** **दिनांक :- ३१/०३/२०२३**

## वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणा-या अरोपीतांस अटक करून दोन पीडीत महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कारवाई.

दिनांक २९/०३/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, वेश्यादलाल नामे १) हरेश्वर केशव राउत, २) गुंडम्मा रानप्पा भांगी ऊर्फ राजश्री हे महिलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना वेगवेगळया ठिकाणी बोलावुन वेश्यागमनाकरीता महिलांना पुरवितात व त्या बदल्यात पुरुष गि-हाईकांकडुन मोबदला घेतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा चे प्रभारी अधिकारी श्री. संतोष चौधरी यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पोलीस स्टाफ, बोगस गिहाईक व दोन पंचासह पेल्हार पोलीस ठाण्याचे हद्दीत तुंगारेश्वर फाटा, वसई पुर्व या ठिकाणी छापा कारवाई करुन आरोपीत नामे १) हरेश्वर केशव राउत, रा. चिखल डोंगरी, विरार (प.), २) गुंडम्मा रानप्पा भांगी ऊर्फ राजश्री, रा. अंधेरी मुंबई यास ताब्यात घेवुन त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेली रिक्षासह एकूण ०१,०२,६७०/-रु. चा माल हस्तगत करुन दोन पिडीत महिलांची वेश्या व्यवसायापासुन सुटका केली आहे. सदरबाबत पोलीस हवलदार बापु पवार यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ३०८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७० (१) (३), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिटचे प्रभारी श्री. संतोष चौधरी, पो.हवा. बापु पवार, राजेश पद्मने, महेंद्र पुंडलिक शेटये, रोशन नारायण किणी, म.पो.हवा.साक्षी डोइफोडे, चालक पो.हवा. सुनिल विष्णु पागी व म.पो.अंम भोर नेम. भरोसा सेल यांनी केली आहे.

-----oooo----